IIP International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# डिजिटल माध्यमे, सोशल मीडिया आणि लोकशाही प्रक्रिया: संधी व आव्हाने

**कु.कल्पना पंडितराव कांबळे**
संशोधक विद्यार्थीनी
के.जे.सोमैया कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,कोपरगांव.

**Article Info**

***Article History:***
Received: 24th January 2026
Accepted: 01st February 2026
Published: 05th February 2026

***Keywords:***

*डिजिटल माध्यमे*
*सोशल मीडिया*

**ABSTRACT**

डिजिटल माध्यमे आणि सोशल मीडिया लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण साधन बनले आहेत. हे माध्यम पारंपरिक माध्यमांच्या तुलनेत अधिक वेगवान, व्यापक आणि संवाद करणारे आहे, ज्यामुळे नागरिकांना मतदान, धोरणनिर्मिती, स्थानिक व जागतिक चर्चेत सक्रिय सहभागी होण्याची संधी मिळते. तथापि चुकीची माहिती, डेटा सुरक्षा समस्या, डिजिटल विभाजन, ट्रोलिंग, द्वेषपूर्ण वक्तव्य आणि पक्षपातीपना यांसारखी गंभीर आव्हाने लोकशाही प्रक्रियेत नकारात्मक प्रभाव निर्माण करतात. या संशोधनात डिजिटल माध्यमांचा लोकशाही प्रक्रियेत होणारा सकारात्मक व नकारात्मक प्रभाव, तसेच उपाययोजना यांचा अभ्यास केला आहे.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: February 02, 2026
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Kamble, K. P. (2026).** डिजिटल माध्यमे, सोशल मीडिया आणि लोकशाही प्रक्रिया: संधी व आव्हाने. *IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 3(1), 645–650.*

❖ **प्रस्तावना:-**

लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग हा त्याचा मुख्य आधारस्तंभ आहे. डिजिटल माध्यमे आणि सोशल मीडिया नागरिकांना थेट माहिती मिळवण्याची संधी देतात राजकीय संवाद साधण्यास प्रोत्साहित करतात आणि सार्वजनिक चर्चेत सहभागी होण्याची सुविधा पुरवतात. उदा. भारतातील २०१९ लोकसभा निवडणुकीदरम्यान ट्विटरवरील **#MyVoteMyVoic**e या हॅशटॅग मोहिमेमुळे युवा नागरिकांचा सहभाग वाढला. तसेच **#FridaysForFuture** जागतिक जलवायू चळवळीद्वारे स्थानिक विद्यार्थ्यांनी जागतिक पातळीवर माहिती व जागरूकता प्रसारित केली. परंतु डिजिटल माध्यमांमध्ये चुकीची माहिती, डेटा सुरक्षा समस्या, डिजिटल विभाजन आणि द्वेषपूर्ण वक्तव्य यांसारखी आव्हाने देखील आहेत. त्यामुळे डिजिटल माध्यमांचा सुरक्षित, समावेशक आणि लोकशाहीस अनुकूल वापर सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

❖ **संशोधन उद्दिष्टे:-**

1)डिजिटल माध्यमे आणि सोशल मीडिया नागरिकांच्या मतदान, सार्वजनिक चर्चेत सहभाग आणि धोरण निर्मितीवरील परिणामांचा सखोल विश्लेषण करणे.

2)चुकीची माहिती, डेटा सुरक्षा, डिजिटल विभाजन, ट्रोलिंग आणि अपमानजनकचित्र, फोटो प्रसारित करणे यांसारख्या आव्हानांचे लोकशाही प्रक्रियेवर होणारे प्रभाव ओळखणे आणि त्यावर प्रभावी उपाययोजना सुचवणे.

❖ डिजिटल माध्यमांसमोरील संधी :-

**१. नागरिकांचा मतदान व धोरण निर्मितीत सक्रिय सहभाग :-**

डिजिटल माध्यमे आणि सोशल मीडिया नागरिकांच्या मतदान व धोरणनिर्मिती प्रक्रियेत सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण साधन ठरली आहेत. पारंपरिक माध्यमांमध्ये नागरिक फक्त माहिती ग्रहण करण्यापुरते मर्यादित असायचे, परंतु डिजिटल माध्यमांमुळे नागरिक थेट माहिती मिळवू शकतात चर्चेत सहभागी होऊ शकतात, आणि सामाजिक समस्यांवर आपले मत व्यक्त करू शकतात. ट्विटर, फेसबुक, इंस्टाग्रामसारख्या प्लॅटफॉर्मवर नागरिक ट्विट, पोस्ट, कमेंट्स, आणि ऑनलाइन चर्चा करून धोरणांवर आपला प्रभाव दाखवतात. उदा.भारतातील २०१९ लोकसभानिवडणुकीदरम्यान#MyVoteMyVoice आणि #ChaloIndia हॅशटॅग मोहिमेमुळे १८-२५ वयोगटातील युवा नागरिक मतदान प्रक्रियेत अधिक सक्रिय झाले. त्यांनी फक्त मतदानाबाबत माहिती घेतली नाही, तर स्थानिक समस्यांवर चर्चा करून समाजात जागरूकता निर्माण केली. डिजिटल माध्यमांमुळे नागरिकांना मतदानाची प्रक्रिया समजून घेणे सोपे झाले, आणि मतदानाचे प्रमाण वाढवण्यास हातभार लागला.शिवाय नागरिक आता ऑनलाईन पद्धतीने आपल्या स्थानिक प्रशासनाशी किंवा राज्य सरकारशी थेट संवाद साधू शकतात. ऑनलाईन पेटिशन्स, सोशल मीडिया फोरम्स, ब्लॉग्ज आणि व्हिडिओ संवाद माध्यमांचा वापर करून ते धोरणांमध्ये सुधारणा सुचवू शकतात. उदा. भारतातील विविध नागरिकांनी ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सचा वापर करून सार्वजनिक सुविधा सुधारण्यास दबाव आणला आहे.

या प्रकारच्या सक्रिय सहभागामुळे लोकशाही अधिक प्रगल्भ व समावेशक होते. नागरिक फक्त सूचना पाळणारे राहत नाहीत तर धोरणनिर्मिती प्रक्रियेत सक्रिय सहभागी बनतात. डिजिटल माध्यमांमुळे मतदान व धोरणनिर्मिती दोन्ही प्रक्रियेत पारदर्शकता वाढते आणि नागरिकांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित होते.

**२. राजकीय संवाद सरळ व परस्पर क्रियाशील :-**

डिजिटल माध्यमांमुळे नागरिक व राजकीय नेते प्रशासन यांच्यात थेट संवाद साधण्याची संधी निर्माण झाली आहे. पारंपरिक माध्यमांमध्ये माहिती संपादित किंवा विलंबित होऊन पोहोचत असल्यामुळे संवाद प्रभावी नसतो. सोशल मीडिया, ई-मेल्स, ऑनलाइन प्रश्नोत्तर सत्र आणि व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे नागरिक थेट प्रश्न विचारू शकतात तक्रारी नोंदवू शकतात तसेच अभिप्राय देऊ शकतात. उदा. युनायटेड स्टेट्समधील बराक ओबामा यांच्या २०१२ च्या प्रचार मोहिमेत फेसबुक, ट्विटर, आणि यूट्यूबच्या माध्यमातून नागरिकांना थेट संवाद साधण्याची संधी मिळाली. नागरिक व्हिडिओ कॉल्सद्वारे मोहीमेतील चर्चेत सहभागी झाले, प्रश्न विचारले, तसेच मतदान प्रक्रियेबद्दल माहिती मिळवली. त्यामुळे निवडणूक प्रचार अधिक परस्पर क्रियाशील आणि नागरिकाभिमुख झाला.

भारतातही डिजिटल माध्यमांचा राजकीय संवादात मोठा प्रभाव दिसतो. पंतप्रधान किंवा मुख्यमंत्री ऑनलाइन प्रश्नोत्तर सत्रांचे

आयोजन करतात जिथे नागरिक थेट प्रश्न विचारतात आणि प्रशासन तत्काळ उत्तर देते. सोशल मीडिया पोल्स, हॅशटॅग्स, आणि लाइव्ह सत्रांमुळे नागरिकांच्या समस्यांबाबत प्रशासनाला तात्काळ माहिती मिळते ज्यामुळे निर्णय प्रक्रियेत सुधारणा करता येते.
यामुळे नागरिक फक्त माहिती ग्रहण करणारे राहत नाहीत तर ते सक्रिय सहभागी बनतात. डिजिटल संवादामुळे राजकीय प्रक्रिया पारदर्शक, तात्काळ, आणि परिणामकारक बनते. नागरिकांचा सहभाग वाढल्यामुळे धोरणांवर नागरिकांचा सकारात्मक प्रभाव पडतो आणि लोकशाही अधिक सक्षम बनते.

**३. स्थानिक ते जागतिक स्तरावर नागरिकांना जोडण्यास मदत :-**

डिजिटल माध्यमांमुळे नागरिक स्थानिक समस्यांपासून जागतिक मुद्द्यांपर्यंत चर्चेत सहभागी होऊ शकतात. पूर्वी नागरिकांचा सहभाग मुख्यतः स्थानिक किंवा राष्ट्रीय पातळीपुरताच मर्यादित होता परंतु सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून स्थानिक समस्यांना जागतिक संदर्भ जोडला जातो. उदा.#FridaysForFuture ही जागतिक जलवायू चळवळीची प्रसिद्ध मोहिम आहे. शालेय विद्यार्थ्यांनी स्थानिक शाळांमध्ये, गावांमध्ये आणि शहरांमध्ये प्रदर्शन करून जागरूकता वाढवली आणि सोशल मीडिया वापरून जागतिक स्तरावर या चळवळीला समर्थन मिळवले. यामुळे स्थानिक समस्यांचा जागतिक संदर्भ नागरिकांना समजला. जागतिक समुदायाने प्रतिक्रिया दिली आणि स्थानिक प्रशासनावर दबाव निर्माण झाला.तसेच नागरिक स्थानिक प्रशासनाच्या समस्यांवर जागतिक स्तरावर मत व्यक्त करून जागतिक समुदायाला जोडतात. सोशल मीडिया वापरून जागतिक स्तरावर चर्चा केल्यास स्थानिक समस्यांवर तात्काळ उपाययोजना होण्यास मदत होते. डिजिटल माध्यमांमुळे स्थानिक चळवळी जागतिक पातळीवर पोहोचतात आणि जागतिक नागरिकांना स्थानिक समस्यांबाबत जागरूक केले जाते.
या प्रकारच्या सहभागामुळे नागरिकांना जागतिक मंचाशी जोडता येते आणि स्थानिक समस्यांवर जागतिक समर्थन मिळते. परिणामी लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा प्रभाव वाढतो आणि स्थानिक-आंतरराष्ट्रीय स्तरावर एकत्रित कार्यसंघ तयार होते.

**४. पारदर्शकता आणि प्रशासनावर नागरिकांचा नियंत्रण व दबाव :-**

डिजिटल माध्यमांमुळे नागरिकांना सरकारी निर्णयप्रक्रिया, धोरणे, योजना याविषयी थेट माहिती मिळते. पारंपरिक माध्यमांमध्ये माहिती संपादित करून दिली जाते असते, परंतु डिजिटल माध्यमांमुळे दस्तऐवज, अहवाल, ऑडिट रिपोर्ट, व सरकारी योजना थेट नागरिकांसमोर येतात उदा. पाकिस्तानमध्ये पीपल्स पार्टी आणि सामाजिक चळवळींनी फेसबुक व ट्विटरवर सरकारी खर्च, योजना, व ऑडिट रिपोर्ट शेअर केले. यामुळे नागरिकांना प्रशासनावर सतत नजर ठेवता आली आणि गैरव्यवहार उघड करण्याचा दबाव निर्माण झाला. भारतात देखील डिजिटल माध्यमांमुळे सरकारी योजना व दस्तऐवज नागरिकांसमोर येतात ज्यामुळे प्रशासन अधिक पारदर्शक होते. डिजिटल माध्यमांमुळे नागरिकांचे प्रशासनावर नियंत्रण वाढले, पारदर्शकता सुधारली आणि लोकशाही प्रक्रियेत उत्तरदायित्व ठोस झाले. नागरिक थेट प्रश्न विचारतात, सूचना देतात, आणि प्रशासनावर सुधारणा करण्याचा दबाव निर्माण करतात. परिणामी सरकारी कामकाज अधिक उत्तरदायी, पारदर्शक, आणि नागरिकाभिमुख बनते.

## ❖ डिजिटल माध्यमांसमोरील आव्हाने :-

**१. चुकीची माहिती आणि फेक न्यूज :-**

डिजिटल माध्यमांवर माहितीचा प्रसार अत्यंत जलद गतीने होतो पण याचसोबत चुकीची माहिती आणि फेक न्यूज हे लोकशाहीसाठी गंभीर आव्हान बनले आहेत. फेक न्यूज म्हणजे अशी माहिती जी खोटी किंवा अर्धसत्य स्वरूपात प्रसारित केली जाते ज्याचा उद्देश लोकमत प्रभावित करणे,समाजात गोंधळ निर्माण करणे किंवा राजकीय लाभ मिळवणे असतो. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर अशा माहितीचा प्रसार अत्यंत सोपा झाला आहे. उदा.अमेरिकेतील २०१६ च्या राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीत रूसी बॉट्स आणि ट्रोल अकाउंट्सने फेसबुक, ट्विटर, आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर खोटी माहिती आणि भ्रामक बातम्या प्रसारित केल्या. या चुकीच्या माहितीमुळे नागरिकांचा मतदानाबाबतचा निर्णय प्रभावित झाला मतभेद अधिक तीव्र झाले आणि लोकशाही प्रक्रियेत अविश्वास निर्माण झाला.
चुकीची माहिती लोकांच्या विश्लेषणात्मक विचारावर परिणाम करते. नागरिक सत्य आणि खोटी माहिती वेगळ्या करणे अवघड होतो ज्यामुळे सार्वजनिक चर्चेवर आणि धोरणनिर्मितीवर नकारात्मक प्रभाव पडतो. भारतात देखील सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर निवडणुकीसंदर्भातील फेक न्यूज प्रसारित होत असतात जसे की व्हॉट्सॲप आणि फेसबुकवर अफवा पसरवणे ज्यामुळे समुदायात

गोंधळ निर्माण होतो.

यावर उपाय म्हणून डिजिटल साक्षरता वाढवणे आवश्यक आहे ज्यामुळे नागरिक फेक न्यूज ओळखू शकतील. सोशल मीडिया कंपन्यांनी पारदर्शक धोरणे राबवून चुकीच्या माहितीवर तत्काळ प्रतिबंध घालावा. नागरिकांना तथ्यांची ओळख पटवण्यासाठी सरकारी आणि खाजगी यंत्रणा एकत्र काम करू शकतात.

**२. डेटा सुरक्षेच्या समस्येमुळे नागरिकांचा विश्वास कमी :-**

डिजिटल युगात नागरिकांचा वैयक्तिक डेटा मोठ्या प्रमाणावर ऑनलाइन संकलित केला जातो. सोशल मीडिया मोबाइल ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्स आणि इंटरनेट सेवा प्रदाते नागरिकांच्या माहितीवर अवलंबून असतात. परंतु या डेटाचा वापर नेहमीच सुरक्षित किंवा पारदर्शक नसतो ज्यामुळे नागरिकांचा विश्वास कमी होतो. उदा. २०१८ मध्ये समोर आलेल्या Cambridge Analytica स्कँडल मध्ये फेसबुकवरून ८५ दशलक्षहून अधिक वापरकर्त्यांचा माहिती गोळा करून निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात आला. या माहितीद्वारे नागरिकांच्या राजकीय पसंती सवयी आणि मनोवैज्ञानिक प्रवृत्तींवर आधारित लक्ष्यित जाहिराती तयार केल्या गेल्या. परिणामी नागरिकांचा मतनिर्णय प्रक्रियेत अप्रत्यक्ष परिणाम झाला आणि माहिती सुरक्षिततेविषयी प्रश्न उपस्थित झाले. माहिती सुरक्षा समस्या लोकशाही प्रक्रियेत गंभीर आव्हान ठरते. नागरिक डिजिटल माध्यमांवर विश्वास ठेवू शकत नाहीत माहिती मिळवण्याची क्षमता प्रभावित होते आणि सार्वजनिक चर्चेत सहभाग कमी होतो.

उपाय म्हणून कडक डेटा संरक्षण कायदे राबवणे, नागरिकांना त्यांच्या वैयक्तिक माहितीवर नियंत्रण देणे, आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पारदर्शक धोरणे राबवणे अत्यावश्यक आहे. जागतिक स्तरावर नियमांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे जेणेकरून माहिती वैध, सुरक्षित आणि फक्त उद्दिष्टपूर्ण वापरासाठी वापरण्यात येईल.

**३. डिजिटल सुविधांतील असमानता :-**

सर्व नागरिकांना समान डिजिटल सुविधा उपलब्ध नसणे ही लोकशाही प्रक्रियेत मोठी अडचण आहे. या समस्येला "डिजिटल सुविधांतील असमानता" असे म्हणतात. डिजिटल सुविधांच्या असमानते मुळे ग्रामीण भागातील नागरिक ऑनलाइन राजकीय संवाद, माहिती मिळवणे मतदान माहिती जाणून घेणे आणि सार्वजनिक चर्चेत सहभागी होणे यापासून वंचित राहतात. उदा. भारतातील ग्रामीण आणि शहरी नागरिकांचा ऑनलाइन राजकीय सहभागात मोठा फरक दिसतो. शहरी नागरिकांना इंटरनेट, स्मार्टफोन आणि डिजिटल साक्षरता अधिक सहज उपलब्ध असते त्यामुळे ते निवडणूक सार्वजनिक धोरणे आणि सामाजिक चळवळीमध्ये सक्रिय राहू शकतात. त्याउलट ग्रामीण भागातील नागरिक इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या अभावामुळे डिजिटल माध्यमांद्वारे चर्चेत सहभागी होऊ शकत नाहीत.डिजिटल सुविधेच्या असमानतेमुळे माहितीअभाव दिसून येतो आणि समाजातील काही गटांचे प्रतिनिधित्व कमी होते. या समस्येमुळे लोकशाही प्रक्रियेत समावेशिता कमी होते.

उपाय म्हणून सरकार आणि समाजाने एकत्र काम करून डिजिटल सुविधा उपलब्ध करून द्यायला हव्यात. ग्रामीण भागात इंटरनेट कनेक्टिव्हिटी वाढवणे, स्मार्टफोन व संगणक प्रशिक्षण कार्यक्रम राबवणे, तसेच स्थानिक भाषांमध्ये ऑनलाइन संसाधने तयार करणे आवश्यक आहे.

**४. संगणकीय प्रक्रियेतील पक्षपातीपणा:-**

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर ट्रोलिंग, **द्वेषपूर्ण वक्तव्य**,धमक्या आणि संगणकीय प्रक्रियेतील पक्षपातीपणामुळे डिजिटल माध्यमांचा वापर सुरक्षित व समावेशक राहत नाही. अल्पसंख्याक गट, महिला, समाजिक चळवळींच्या नेत्यांवर **द्वेषपूर्ण वक्तव्याचा** प्रभाव मोठ्या प्रमाणावर दिसतो.उदा. भारतातील विविध महिला नेत्यांवर, अल्पसंख्याक समुदायांवर ऑनलाइन धमक्या व ट्रोलिंगचा धोका सतत राहतो. तसेच सोशल मीडिया अल्गोरिदम्स लोकप्रिय किंवा ट्रेंडिंग सामग्री अधिक प्रदर्शित करतात ज्यामुळे काही सामाजिक मुद्दे दुर्लक्षित राहतात आणि चुकीची माहिती लोकांपर्यंत पोहोचते. यामुळे नागरिकांचा ऑनलाइन सहभाग कमी होतो आणि लोकशाही प्रक्रियेत सामाजिक समावेश बाधित होतो नागरिक सुरक्षित व समावेशक वातावरण नसल्यास डिजिटल माध्यमांमध्ये सक्रिय राहणे टाळतात.

उपाय म्हणून सोशल मीडिया कंपन्यांनी ट्रोलिंग, हेट स्पीचवर कठोर नियम राबवावे, अल्गोरिदमिक बायस कमी करण्यासाठी पारदर्शक धोरणे तयार करावीत, आणि डिजिटल साक्षरता वाढवावी. नागरिकांना सुरक्षित आणि समावेशक डिजिटल वातावरण

उपलब्ध करून दिल्यास लोकशाही प्रक्रियेत सर्वांचा सहभाग सुनिश्चित होऊ शकतो

❖ **संशोधन पद्धती :-**

या अभ्यासासाठी विविध संशोधन पद्धती वापरल्या गेल्या ज्यामुळे डिजिटल माध्यमे, सोशल मीडिया आणि लोकशाही प्रक्रियेवरील परिणामांचे सखोल विश्लेषण करता आले.

१. **दुय्यम स्रोतांचा वापर** :-

पूर्वसाहित्यातून माहिती गोळा केली गेली, ज्यात शास्त्रीय लेख, निवडणूक अहवाल, सरकारी दस्तऐवज, सोशल मीडिया अहवाल आणि जागतिक अभ्यासांचा समावेश होता. यामुळे नागरिकांचा सहभाग, सोशल मीडिया मोहिमांचा परिणाम, पारदर्शकता, फेक न्यूज, डेटा सुरक्षा आणि डिजिटल विभाजन यावरील माहिती संकलित झाली.

**२. केस स्टडी पद्धत** :-

ठोस उदाहरणांसाठी केस स्टडी वापरली गेली. यात भारतातील २०१९ लोकसभा निवडणूक (#ChaloIndia, #MyVoteMyVoice), युनायटेड स्टेट्स २०१२ प्रचार मोहीम (बराक ओबामा), आणि #FridaysForFuture जागतिक जलवायू चळवळीचा अभ्यास केला गेला. यामुळे स्थानिक ते जागतिक स्तरावरील नागरिक सहभाग समजला.

**३. गुणात्मक विश्लेषण** :-

नागरिकांचा सहभाग, सोशल मीडिया मोहिमांचा परिणाम, पारदर्शकता व जागरूकता यांचे गुणात्मक विश्लेषण केले गेले. ट्विट, पोस्ट, कमेंट्स आणि ऑनलाइन चर्चेत नागरिकांची भूमिका व धोरण प्रक्रियेत होणारे बदल अभ्यासले गेले.

❖ **साहित्य आढावा:-**

- डिजिटल माध्यमांनी नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवला आहे, जसे की ट्विट, पोस्ट, कमेंट्स आणि ऑनलाइन चर्चेद्वारे मत व्यक्त करणे. (उदा. भारतातील २०१९ लोकसभा निवडणूक)
- सोशल मीडिया पारदर्शकता वाढवण्यासाठी प्रभावी ठरते जसे पाकिस्तानमध्ये पीपल्स पार्टीने सरकारी खर्चाचे ऑडिट रिपोर्ट सोशल मीडियावर शेअर केले.
- राजकीय संवाद अधिक इंटरऐक्टिव्ह झाला आहे; उदाहरणार्थ, बराक ओबामा यांच्या २०१२ च्या प्रचार मोहिमेत फेसबुक आणि ट्विटर वापरून नागरिकांना थेट संवाद साधण्याची संधी मिळाली.
- जागतिक पातळीवर स्थानिक समस्यांचा संदर्भ घेता येतो; #FridaysForFuture मोहिमेने जागतिक स्तरावर नागरिकांचा सहभाग दाखवला.

- **निष्कर्ष :-**

सदर अभ्यासातून असे स्पष्ट होते की डिजिटल माध्यमे आणि सोशल मीडिया यांनी लोकशाही प्रक्रियेत आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. नागरिकांचा मतदानातील सहभाग, सार्वजनिक चर्चेत सक्रियता, तसेच धोरणनिर्मिती प्रक्रियेत सहभाग यामध्ये लक्षणीय वाढ झालेली दिसून येते. डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे संवाद अधिक परस्परसंवादी, तात्काळ आणि व्यापक झाला असून स्थानिक ते जागतिक स्तरावरील प्रश्नांवर नागरिक एकत्र येऊ शकतात. पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि प्रशासनावर नागरिकांचा दबाव वाढवण्यात डिजिटल माध्यमांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे.

तथापि, या प्रक्रियेसमोर काही गंभीर आव्हाने उभी राहिली आहेत. चुकीची माहिती व फेक न्यूज लोकमतावर विपरीत परिणाम घडवतात. डेटा सुरक्षा समस्या नागरिकांचा विश्वास कमी करतात.डिजिटल सुविधांतील असमानता समावेशकतेस अडथळा निर्माण करते तसेच ट्रोलिंग, द्वेषपूर्ण वक्तव्ये आणि संगणकीय प्रक्रियेतील पक्षपातीपणा सामाजिक ऐक्य व लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचवतात. त्यामुळे डिजिटल माध्यमांचा उपयोग लोकशाही सुदृढ करण्यासाठी करायचा असल्यास कडक डेटा संरक्षण कायदे, डिजिटल साक्षरता, पारदर्शक धोरणे आणि समावेशक तंत्रज्ञान धोरणे राबवणे अत्यावश्यक आहे.

एकूणच डिजिटल माध्यमे ही लोकशाहीसाठी संधी आणि आव्हाने दोन्ही निर्माण करणारी द्वैध स्वरूपाची शक्ती आहे. योग्य नियमन, जबाबदार वापर आणि नागरिक सक्षमीकरणाद्वारेच डिजिटल युगातील लोकशाही अधिक पारदर्शक, उत्तरदायी आणि

समावेशक बनू शकते.

### ❖ संदर्भग्रंथ :-


- Castells, M. (2012). Networks of Outrage and Hope: Social Movements in the Internet Age. Cambridge: Polity Press. (Online Resources)
- Sunstein, C. R. (2017). #Republic: Divided Democracy in the Age of Social Media. Princeton University Press. (Online Resources)
- Allcott, H., & Gentzkow, M. (2017). "Social Media and Fake News in the 2016 Election." Journal of Economic Perspectives. (Online Resources)
- Howard, P. N., & Kollanyi, B. (2016). "Bots, #Strongerin, and #Brexit." Oxford Internet Institute. (Online Resources)
- Tufekci, Z. (2015). "Algorithmic Harms beyond Facebook and Google."
  Colorado Technology Law Journal. (Online Resources)
- भारत निवडणूक आयोग (2019). लोकसभा निवडणूक अहवाल 2019. (Online Resources)
- European Commission (2018). Tackling Online Disinformation: A European Approach. (Online Resources)
- United Nations (2020). Digital Cooperation Report (Online Resources)